सर्वांसाठी पाणी - टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान राबविणेबाबत.

## महाराष्ट्र शासन
## जलसंधारण विभाग
## शासन निर्णय क्रमांकः जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: १ मार्च, २०१६

वाचा-

१) **ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक : जलअ -२०१४/ प्र.क्र.२०३/जल-७ दिनांक ५ डिसेंबर,२०१४, व दिनांक ०३ मार्च, २०१५**

२) **ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन शुद्धीपत्रक क्रमांक : जलअ -२०१४/ प्र.क्र.२०३ / जल-७ दिनांक २८ जानेवारी, २०१५**

**प्रस्तावना :**

सर्वासाठी पाणी टंचाई मुक्त महाराष्ट्र -२०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायस्वरूपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान राज्यात संदर्भाधीन दिनांक ५ डिसेंबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे.

शासन निर्णय दिनांक ५ डिसेंबर २०१४ च्या परिच्छेद क्रमांक ५ मध्ये सुधारणा करून आता तालुका स्तरावर तालुक्यातील विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली आढावा व समन्वय समितीचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

### शासन निर्णय :

शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण क्र. जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७ दिनांक ५ डिसेंबर, २०१४ मधील परि. क्र ५ नुसार तालुका स्तरीय आराखडा सर्व यंत्रणांच्या समन्वयाने तयार करून जिल्हास्तरीय समितीस सादर करण्याकरिता उपविभाग़िय अधिकारी (प्रांत) यांच्या अध्यक्षतेखाली तालुका स्तरीय समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीची कार्यकक्षा अबाधित ठेवून अभियांनातर्गत राबविल्या जाण-या प्रकल्पांच्या आढावा घेणे व समन्वय करणे यासाठी खालीलप्रमाणे तालुकास्तरीय आढावा व समन्वय समिती गठीत करण्यास शासन मान्यता देत आहे.

**तालुकास्तरीय आढावा व समन्वय समिती** : या अभियानांतर्गत राबविल्या जाणाऱ्या प्रकल्पांचे आढावा घेणे व समन्वय करणे यासाठी तालुक्यातील विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे. :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | तालुक्यातील विधानसभा सदस्य | : | अध्यक्ष |
| २. | उपविभागीय अधिकारी (प्रांत) | : | सह अध्यक्ष |
| ३. | तालुक्यातील विधान परिषद सदस्य | : | विशेष आमंत्रित |
| ४. | पंचायत समिती सभापती | : | सदस्य |
| ५. | तहसिलदार | : | सदस्य सचिव |
| ६. | गट विकास अधिकारी | : | सदस्य |
| ७. | उपविभागिय कृषि अधिकारी | : | सदस्य |
| ८. | तालुक्यातील पातळीवरील सर्व संबंधीत अधिकारी | : | आमंत्रित |

**समितीची कार्यकक्षा :**

१. कार्यक्रमाचा आढावा घेणे व मार्गदर्शन करणे.

२.वेगवेगळ्या विभागात समन्वय करून Convergence करण्याकरिता मार्गदर्शन करणे.

३. कार्यक्रमाबाबत तालुकास्तरावर येत असलेल्या अडचणीचे निराकरण करणे

४. तालुक्यातील गावामधील लोकांचा अभियानाकरिता सहभाग वाढविणे

५. घेण्यात आलेल्या आढाव्यामधील बाबी जिल्हास्तरीय आढावा व संनियंत्रण समितीस कळविणे

६. या समितीची बैठक दोन महिन्यातून एकदा घेण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०३०११६३०१९३४२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vinod S Wakhare

Digitally signed by Vinod S Wakhare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8f4277e1c48d95adb75a5d959bbb8f12b61892a0bf91d9d7250d0bfd4f204c77, cn=Vinod S Wakhare
Date: 2016.03.05 12:41:51 +05'30'

**(वि.सि.वखारे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा सभापती विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे सचिव
३. मा अध्यक्ष विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे सचिव

४. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधान परिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. सर्व सन्माननीय विधानसभा/ विधान परिषद व संसद सदस्य.
७. मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
८. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
९. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
१०. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव , मंत्रालय, मुंबई.
११. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे
१२. सर्व विभागीय आयुक्त
१३. संचालक (मृदसंधारण), कृषि आयुक्तालय, पुणे
१४. मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), पुणे.
१५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता).
१६. सर्व जिल्हाधिकारी
१७.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद
१८. महालेखापाल ½, महाराष्ट्र राज्य , मुंबई/ नागपूर (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता).
१९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२०. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
२१. सर्व उपायुक्त (विकास) , विभागीय आयुक्त कार्यालय,
२२. सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२३. सर्व अधिक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ,
२४. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
२५. सर्व कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण)
२६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२७.सर्व मंत्रालयीन विभाग
२८. सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव/ कार्यासन अधिकारी, ग्रा. वि. व ज. सं. विभाग
२९. नियोजन विभाग /वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३०. कार्यासन जल-११ ग्रा. वि. व ज. सं. विभाग मंत्रालय, मुंबई.
३१. जल-७, निवड नस्ती.